# ११ बालकांसाठी केंद्रे



**तुमचे निरीक्षण लिहा.**

- तुम्ही कधी अर्भक किंवा शिशुला सकाळी पाळणाघर किंवा बालसंगोपन केंद्रात जाताना पाहिले आहे का?
- त्यांच्या चेहऱ्यावर कोणते भाव असतात किंवा त्यांचे त्यावेळी हातवारे कसे असतात?
- त्यांच्या प्रतिक्रिया कशा असतात?

आजच्या काळात आपल्याला आपल्या अवती भोवती काम करणाऱ्या भरपूर स्त्रिया आढळतात. त्यामुळे बालकांकडे लक्ष देण्याची आणि त्यांची काळजी घेण्याची गरज वाढली आहे. आता हे दृश्य फक्त शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातही दिसून येते.

**कृती**

- आजच्या घडीला शहरांमधून कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या स्त्रिया करत आहेत आणि किती तास त्या स्त्रिया कामासाठी घराबाहेर घालवतात त्याची यादी करा.
- आजच्या घडीला ग्रामीण भागातून कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या स्त्रिया करत आहेत आणि किती तास त्या स्त्रिया कामासाठी घराबाहेर घालवतात त्याची यादी करा.

## ११.१. बालसंगोपन आणि बालशिक्षण याचा इतिहास (History of Child rearing and Child education)

जुन्या काळात नेमके काय घडले आणि त्याबरोबरीने प्रगती कशी होत गेली हे आपल्याला इतिहासामुळे कळते. या पृथ्वीवर जे जे निर्माण झालेले आहे त्या प्रत्येक गोष्टीमागे इतिहास असतो, हीच गोष्ट बालविकास, बालसंगोपन आणि बालशिक्षण या क्षेत्रांशी निगडीत आहे. इतिहास माहित करून घेणे आणि आपण सध्याच्या घडीला कोठे आहोत हे जाणून घेणे मनोरंजक ठरेल.

बालविकास, बालसंगोपन आणि बालशिक्षण या विषयाचा जागतिक पातळीवर घेतलेला आढावा लक्षात घेता हे तीनही विषय एकत्रित गृहीत धरले जातात.

- गेल्या अनेक शतकात बाल्यावस्थेच्या काळाचा वेगळा विचार केला जात नव्हता. ११ ते १६ या शतकामध्ये बालके म्हणजे मानवाची प्रतिकृती आहे असे मानले जात होते. उदा. बालकांचे कपडे मोठ्या माणसांप्रमाणे असायचे. बालकांचे लहानपण असते अशा संकल्पना विचारातही नसायच्या.
- मध्ययुगीन बालकांकडून गुराढोरांना किंवा शेतावरील प्राण्यांना चारा घालणे, घरातील भांडी घासणे किंवा लहान भावंडांची दिवसभर काळजी घेणे याची अपेक्षा असायची. बालकांची खेळणी कुटुंबाने हातानेच बनवलेली असायची. ही खेळणी म्हणजे बाहुल्या, भोवरे, ठोकळे अशी असायची.
- मध्ययुगीन बालकांना कुटुंबाकडून किंवा समाजाकडून महत्त्व दिले जात नव्हते. बालकांच्या आयुष्याचे अर्भकावस्था, शैशवावस्था असे भाग पाडलेले नव्हते.
- शाळा सुटल्यानंतर पालक आपल्या बालकांना बाहेर खेळण्यासाठी सोडत होते. खेळताना बालकांवर कोणाचीही देखरेख नसायची. सर्व बालके स्वतःच्या मोठ्या भावंडांबरोबर किंवा इतर मोठ्या बालकांबरोबर खेळत असत. या खेळण्यामध्ये पळणे, उड्या मारणे, दोरीवरच्या उड्या मारणे, झाडावर चढणे, तोल सांभाळण्याचे खेळ खेळणे, आणि इतरही बरेच खेळ यांचा समावेश होता.

- मध्ययुगीन काळात वात्सल्य या भावनेचा मोठ्या प्रमाणावर अभाव होता. याला आधारभूत काही उदाहरणे म्हणजे सर्रासपणे गर्भपात करणे, अर्भक मृत्युदर जास्त, बालमजुरी, अति कडक शिस्त. याचप्रमाणे गाणी म्हणणे, नृत्य करणे, शिकार करणे, मासे पकडणे या गोष्टी आवडीने केल्या जात असत.

**तुमचे मत लिहा.**

आत्ताच्या घडीला आधुनिक युगात बालके कसे राहणीमान जगत आहेत?

बालविकासाच्या इतिहासानुसार बालशिक्षणाचा इतिहास मनोरंजक आहे. बालशिक्षणात बदल घडत असतानाच हळू हळू बालकांकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलत गेला. खूप तत्त्ववेत्ते आणि शिक्षणतज्ञ यांना बालकांबद्दल आस होती. त्यांनी अभ्यास करून त्यांची मते जगासमोर मांडून त्यांचे योगदान दिले आहे.

- पहिली अशी व्यक्ती जी बालशिक्षणाच्या क्षेत्रामध्ये प्रथम स्थापक मानली जाते, त्यांचे नाव जॉन कोमिनस. त्यांनी बालशिक्षणाकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टीकोन दिला.
- बालकांचे वर्गीकरण त्यांनी त्यांच्या वैयक्तिक फरकांनुसार केले.
- मातांनी खूप सुरुवातीपासून बालकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना इंद्रिय शिक्षण द्यावे या मताचे ते होते.
- शालेय कामकाजाचे तास कमी असावेत.
- सकारात्मक शिस्तीला प्रोत्साहन द्यावे.
- शालेय काम आणि जीवन यांचा एकमेकांशी जवळचा संबंध असावा.




**जॉन कोमिनस** युरोपियन शिक्षणतज्ञ (१५९२ – १६७०) आधुनिक शिक्षणातील पितामह.

बालशिक्षणाचा सर्व इतिहास जॉन कोमिनस यांच्यापासून सुरू झाला आणि त्यानंतर अनेक पाश्चिमात्य आणि पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांनी बालके आणि बालशिक्षण याविषयी स्वतःची मते व विचार मांडले.

**पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांचे शिक्षणविचार (EDUCATIONAL THOUGHTS BY WESTERN PHILOSOPHERS)**

| अनु. क्र. | तत्त्ववेत्त्यांचे नाव | शिक्षणविचार |
|---|---|---|
| १. | **रुसो** फ्रेंच तत्त्ववेत्ता  (१७१२–१७७८) | • 'एमिल' हे प्रसिद्ध पुस्तक लिहिले.<br>• देव सर्व गोष्टी बनवतो यावर दृढ विश्वास होता.<br>• मानव शिक्षणाने संस्कारित होतो.<br>• इंद्रिय शिक्षण सर्वात महत्त्वाचे.<br>• खेळाद्वारे शिक्षण या पद्धतीचा उपयोग बालशिक्षणात व्हावा.<br>• विज्ञान शिकवण्यासाठी नसून बालकांनी ते 'शोध घेऊन' शिकावे.<br>• शिक्षकांनी बालकांचा सखोल अभ्यास करावा.<br>• प्रत्येक गोष्ट करून बघावी आणि अध्ययन करावे हे महत्त्वाचे. |

| | | |
|---|---|---|
| २. | **जॉन पेस्टॉलॉझी**<br>स्वीस शिक्षणतज्ञ<br><br>(१७४६-१८२७) | • शिक्षण म्हणजे माणसाच्या अंगी असणाऱ्या सर्व शक्ती आणि क्षमतांचा नैसर्गिक, प्रगतीशील आणि लयबद्ध विकास.<br>• बालकांचा सखोल अभ्यास करून त्यानुसार योग्य अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा.<br>• इंद्रिय संवेदन महत्त्वाचे आहे.<br>• निसर्ग सर्वात उत्तम शिक्षक आहे.<br>• बालकांना स्वयंनियंत्रणासाठी मार्गदर्शन करा.<br>• बालकांना प्रेम व वात्सल्य द्या. |
| ३. | **जॉन फ्रेडरिक हर्बार्ट** (पेस्टॉलॉझी यांचे अनुयायी) जर्मन शिक्षणतज्ञ<br><br>(१७७६-१८४१) | • बालकांच्या मनातील विशिष्ट व लक्षात येण्यासारख्या कल्पनांशी मिळते जुळते शिक्षण असावे.<br>• बालकांना सुचणाऱ्या नवीन कल्पना टिकवण्यासाठी शिक्षकांनी मदत करावी.<br>• बालकाचे मन शिक्षकाला जाणता आले पाहिजे.<br>• अध्यापनातील औपचारिक पायऱ्या सांगणारा प्रणेता<br>➢ तयारी<br>➢ सादरीकरण<br>➢ उपयोजन<br>• शिक्षणाचे प्रमुख कार्य सदाचरण हेच असावे. |
| ४. | **फ्रेडरिक फ्रोबेल** (पेस्टॉलॉझी यांचे अनुयायी) जर्मन शिक्षणतज्ञ<br><br>(१७८२-१८५२) | • बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षिस (गिफ्ट) असे म्हटले.<br>• १८४० मध्ये किंडरगार्टन नावाची शाळा सुरू केली.<br>• बाल्यावस्थेमध्ये बालकाची स्वतःची सृजनशीलता असते.<br>• बालकाचा आतला आत्मा आणि बालकाला शिक्षणातून मिळणारे अनुभव यांचा ताळमेळ असावा.<br>• बालकाच्या उत्स्फुर्त विकासासाठी खेळ आवश्यक आहे.<br>• गाणी, हालचाली, रचना यांच्यात संबंध आहे या तिन्हीच्या समन्वयातून हावभाव आकाराला येतात. |
| ५. | **हर्बार्ट स्पेन्सर** इंग्लिश शिक्षणतज्ञ<br><br>(१८२०-१९०३) | • परिपूर्ण आयुष्य जगण्यास शिकवणे हा शिक्षणाचा प्रमुख हेतू असावा<br>• शिक्षणातील महत्त्वाची अनुभव वचने सांगितली<br>➢ सोप्याकडून अवघडकडे<br>➢ ओळखीकडून अनोळखीकडे<br>➢ मुर्ताकडून अमूर्ताकडे |


| | | |
|---|---|---|
| ६. | **जॉन ड्युई** अमेरिकन शिक्षणतज्ञ<br><br>(१८५७-१९५०) | • शिक्षणामध्ये प्रगतीवाद आणि प्रयोगवाद ही तत्वे असावीत.<br>• शिकागो येथे प्रयोगशाळा म्हणून पूर्वप्राथमिक शाळा चालवल्या.<br>• प्रत्येकाकडे वैयक्तिक क्षमता असतात ज्याद्वारे ते स्वतः भोवतीचे वातावरण नियंत्रणात ठेऊ शकतात.<br>• वाढीच्या प्रक्रियेत शिक्षणाची मदत होते.<br>• शाळेमधील कृती अत्यंत सोप्या व सरळ असाव्यात ज्यामुळे वाढ व विकासाला मदत होईल.<br>• शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे.<br>• शाळेच्या अभ्यासक्रमात सामाजिक आयुष्य प्रतिबिंबित व्हावे.<br>• कृतियुक्त शिक्षण हे पायाभूत तत्त्व असावे.<br>• सामाजिक शिस्त लावावी.<br>• शिक्षकाने योग्य वातावरण पुरवावे.<br>• वास्तववादी विचार विकसित करावेत.<br>• बालकांच्या आवडीचा विचार करावा. |
| ७. | **मारिया माँटेसरी**<br>इटालियन डॉक्टर शिक्षणतज्ञ तत्त्ववेत्त्या<br><br>(१८७०-१९५२) | • प्रयोगवाद आणि प्रगतीवाद याचा शिक्षणात वापर केला.<br>• माँटेसरी शिक्षण पद्धतीच्या प्रणेत्या.<br>• मानसिकदृष्ट्या दुर्बल बालकांसाठी खूप काम केले.<br>• रंग, वास, चव, आवाज शिकवण्यासाठी त्यांनी साहित्य तयार केले. उंची, लांबी, जाडी शिकवण्यासाठी विटा तयार केल्या.<br>• इंद्रिय शिक्षणाला खूप महत्त्व दिले.<br>• शिक्षकाने बालकाला प्रेम आणि मुक्तता द्यायला हवी.<br>• शिस्तीचा बडगा दाखवून, भीती दाखवून बालकाचे व्यक्तिमत्त्व खुजे करू नये.<br>• वस्तू स्वरुपात बक्षीस किंवा शिक्षा देऊ नये.<br>• स्वयंअध्ययनावर भर.<br>• सूक्ष्म कारक कौशल्यांवर भर.<br>• शालापूर्व बालकांना परीकथा सांगू नयेत. |
| ८. | **अर्नोल्ड जिसेल**<br>अमेरिकन बालमानसशास्त्रज्ञ<br><br>(१८७८-१९५८) | • पूर्वप्राथमिक शिक्षणातील खूप संशोधने केली.<br>• प्रौढ वयात दिसून येणाऱ्या काही मानसिक आजारांची मुळे बाल्यावस्थेत असतात असा निष्कर्ष काढला.<br>• सुरुवातीच्या वर्षात योग्य शिक्षण दिले गेले तर हे मानसिक आजार टाळता येतात. |

| | | |
|---|---|---|
| ९. | **जे. बी. वॉटसन**<br>अमेरिकन मानसशास्त्रज्ञ<br><br>(१८८०-१९६१) | • अध्ययनाबाबत प्रयोग केले.<br>• प्रयोगातून दोन तत्त्वांचा निष्कर्ष काढला.<br>➢ सरावाचे तत्त्व<br>➢ अगदी नव्याने शिकून लक्षात ठेवलेल्या गोष्टी हे तत्त्व<br>• या तत्त्वांनुसार या दोन तत्त्वांच्या पुनरावृत्तीमुळे यशप्राप्ती होते. |
| १०. | **जाँ पियाजे**<br>स्वीस मानसशास्त्रज्ञ<br><br>(१८९६-१९८०) | • बालकांच्या विचारक्षमतेबाबत क्रांतिकारी विचार मांडले.<br>• बालक निरनिराळ्या वैकासिक अवस्थांमधून जात असते.<br>➢ शोधवृत्ती<br>➢ सराव<br>➢ प्रेरणा<br>➢ स्मरण<br>➢ ज्ञान गोळा करणे आणि नवीन ज्ञानाला मध्यवर्ती मज्जासंस्थेत जागा करणे.<br>• बालकांना प्रशिक्षण द्यायला खूप महाग वस्तूंची गरज नाही.<br>• सुसुत्र आणि सुनियोजित अध्ययन अनुभवांची गरज बालकांना असते. |

## पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांचे शिक्षणविचार (EDUCATIONAL THOUGHTS BY ESTERN PHILOSOPHERS)

### भारतीय तत्त्ववेत्ते (INDIAN PHILOSOPHERS)

| अनु क्र. | तत्त्ववेत्त्यांचे नाव | शिक्षणविचार |
|---|---|---|
| १. | **स्वामी दयानंद (आर्य**<br>समाजाचे आद्यप्रवर्तक)<br><br>(१८२४-१८८३) | • ज्ञान प्राप्त केलेच पाहिजे.<br>• प्रेम व विश्वास ही मुल्ये रुजवावीत.<br>• शारीरिक विकास महत्त्वाचा आहे.<br>• 'गुरु' म्हणजेच शिक्षक हा बालकांचा दुसरा पालकच असतो. |

| | | |
|---|---|---|
| २. | **गुरु रवीन्द्रनाथ टागोर**<br><br>(१८६१-१९४१) | • निसर्गाच्या सान्निध्यातच शिक्षण चांगले होते.<br>• बालकाच्या जागृत बुद्धिपेक्षा त्याची नकळत असणारी बुद्धिमत्ता अधिक प्रभावी ठरते.<br>• मानवी नात्यांमध्ये शिक्षकाने विश्वास दाखवावा. |
| ३. | **स्वामी विवेकानंद**<br>(रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य)<br><br>(१८६३-१९०२) | • माणसातील अचूकतेचा अविष्कार म्हणजेच शिक्षण होय.<br>• आपण बालकांना सकारात्मक कल्पना पुरवल्या पाहिजेत.<br>• मन एकाग्र करणे व ध्यानधारणा यातून मानसिक विकास होतो. |
| ४. | **महात्मा गांधी**<br><br>(१८६९-१९४८) | • पहिल्या पाच वर्षात बालक जे शिकते व आत्मसात करते त्या गोष्टी नंतरच्या आयुष्यात ते शिकत नाही.<br>• शिक्षण म्हणजे बालकामधील चांगल्या गोष्टी चौफेर विकसित करणे.<br>• नयी तालीम- म्हणजे स्वयं अध्ययन हा शिक्षणातील महत्त्वाचा भाग आहे.<br>• श्रम प्रतिष्ठेला मुल्य असते. |
| ५. | **आरोबिंदो घोष**<br><br>(१८७२-१९५०) | • त्यांचा दृष्टीकोनच एकात्मिकतेवर भर देणारा होता त्यामुळे त्यांच्या तात्त्विकतेला एकात्मिक तात्त्विकता म्हणतात.<br>• मानवी व्यक्तिमत्त्वातील भौतिक आणि अध्यात्मिक बाजूंचे एकात्मीकरण झाले पाहिजे असे त्यांचे मत होते.<br>• त्यांच्या मते (१९७२ भाग १७ पी-203) शिक्षणाचा खरा पाया म्हणजे मानवी मनाचा अभ्यास, अर्भक, किशोरवयीन मुले/मुली, आणि प्रौढ आहेत.<br>• शिक्षणाचा हेतू आयुष्याच्या हेतूशी संबंधित असावा. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **गिजुभाई बधेका**<br><br>(१८८५-१९३९) | • माँटेसरी पद्धतीमध्ये खूप रस घेऊन अभ्यास केला.<br>• माँटेसरी मॅडम यांनी दिलेली पूर्व प्राथमिक शाळेची आदर्श उद्दिष्टे आणि शाळेचे तत्त्वज्ञान यांचा सखोल अभ्यास केला.<br>• १९२० साली गुजराथमध्ये दक्षिणामूर्ती बालमंदिर सुरू केले.<br>• गुजराथ, महाराष्ट्र व इतर प्रांतांमध्ये गिजुभाईंच्या कामाने अनेक व्यक्ती प्रभावित झाल्या त्यापैकी एक ताराबाई मोडक होत्या. |
| ७. | **ताराबाई मोडक**<br><br>(१८९२-१९७३) | • विकासवाड्या सुरू केल्या.<br>• भारतातील पूर्वप्राथमिक शिक्षण व बालकल्याणाचा पाया रचला.<br>• ग्रामीण भागामध्ये सर्वात अगोदर अंगणवाड्या सुरू केल्या.<br>• नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. |
| ८. | **पद्मश्री अनुताई वाघ**<br><br>(१९१०-१९९२) | • ताराबाई मोडक यांनी घालून दिलेल्या तत्त्वांच्या अनुयायी.<br>• १९८२ साली ग्राममंगल संस्थेची स्थापना केली.<br>• पूर्वप्राथमिक प्रशिक्षण केंद्र उभारणी केली.<br>• मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी चांगले बालशिक्षण असावे असे मत मांडले.<br>• 'कोसबाडच्या टेकडीवरून' हे पुस्तक लिहिले. |

**तुमचे मत**

आत्ता वाचलेल्या सर्व तत्त्ववेत्त्यांनी व शिक्षणतज्ज्ञांनी मांडलेल्या मतांपैकी कोणती मते तुम्हाला आजच्या काळातील शाळांमधून आढळतात?

## १.२ लहान बालकांसाठी निरनिराळ्या केंद्रांची गरज (Need for various centers for young children)

**कृती :**

तुमच्या शहरात किंवा गावात चालवल्या जाणाऱ्या बालकांसाठीच्या केंद्रांची यादी पूर्ण करा.

आजच्या काळात समाजरचनेत आणि कुटुंब पद्धतीत खूप बदल झाले आहेत. आधुनिकीकरण, जागतिकीकरण आणि शहरीकरण या सगळ्यामुळे लोकांच्या राहणीमानाच्या गरजा पूर्ण बदलत्या आहेत. निश्चितच याचा बालकांवरही खूप प्रभाव पडलेला आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या राहणीमानानुसार आवश्यक ते समायोजन बालकांना करावे लागते. उदा. पालकांचे लक्ष नसणे, प्रेम व वात्सल्य याचा अभाव, भावनिक सुरक्षिततेसारख्या गरजांचे अंशतः समाधान होणे, खेळायला कमी जागा असणे किंवा सामाजिकरणाची संधी कमी मिळणे.

या सर्व कारणांमुळे हळू हळू बालकांसाठी विविध प्रकारची केंद्रे उघडण्याची गरज निर्माण झाली. अशी कोणकोणती केंद्रे आहेत जी बालकांना त्यांच्या आयुष्याचे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरणार आहे त्यांची माहिती आपण करून घेऊ.


या केंद्रांचा अभ्यास करण्यासाठी ती केंद्रे आपण तीन भागात विभागू.

लहान बालकांसाठी केंद्रे

(अ) बालसंगोपन केंद्र | (ब) बालशिक्षण केंद्र | (क) करमणूक केंद्रे

## १.३ निरनिराळी केंद्रे आणि त्यांची उद्दिष्टे (Various Centers and their objectives)

### (अ) बालसंगोपन केंद्र (Child Day Care Centers)



**चित्र ११.१ बालसंगोपन केंद्र**

आजच्या काळात जवळपास प्रत्येक घराआड एका घरातील स्त्री नोकरीसाठी घराबाहेर जाताना आढळते. त्यामुळे पालकांच्या अनुपस्थितीत बालकांची काळजी घेतली जाण्याची गरज आहे. आजच्या काळात ही गरज बालसंगोपन केंद्रांमुळे पूर्ण होते. क्रेश (Creche) हा फ्रेंच शब्द बालसंगोपन केंद्र यासाठी किंवा पाळणाघर यासाठी वापरला जातो. जगातले सर्वात पहिले बालसंगोपन केंद्र फ्रान्स येथे १८४० साली सुरू झाले. औद्योगिक गरज म्हणून १९व्या शतकात युरोप येथे अनेक क्रेश सुरू झाली.

बालसंगोपन केंद्रामध्ये प्रशिक्षित व कुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. कर्मचाऱ्यांनी नेहमी बालसंगोपन केंद्रांची उद्दिष्टे पाळली पाहिजेत.

**बालसंगोपन केंद्रांची उद्दिष्टे (Objectives of Child Day Care Centers)**

- बालक केंद्रित वातावरण पुरवणे

- बालकांच्या सर्वांगीण विकासाला पूरक वातावरण पुरवणे.
- बालकांना मोकळे आणि सुरक्षित वातावरण पुरवणे.
- सर्व वयोगटातील बालकांच्या गरजा पूर्ण करणे.
- प्रत्येक बालकाचे व्यक्तीविशिष्टत्व जपणे.
- स्वमदत कौशल्य व स्वावलंबन याला चालना देणे.
- आरोग्य, स्वच्छतापूर्ण आरोग्य सवयी व स्वच्छतेच्या सवयी रुजवणे.

**दर्पण**

- तुम्हाला स्वतःला लहानपणी बालसंगोपनकेंद्रात किंवा पाळणाघरात जाण्याचा अनुभव आहे का?
- तुमचा अनुभव थोडक्या शब्दात लिहा.
- तुमचे बालसंगोपनकेंद्र कसे होते? तिथे कोणत्या सुविधा होत्या?

## (ब) बालशिक्षण केंद्रे (Early Childhood Education Centers)

बालशिक्षण केंद्रे म्हणजेच पूर्वप्राथमिक शाळा असतात.

**कृती**

- तुमच्या शहरात, नगरात, गावात कोणत्या प्रकारच्या पूर्वप्राथमिक शाळा आहेत त्यांची यादी करा. (३ ते ६ वर्षे वयोगटाच्या शाळा)
- हे प्रकार लिहित असताना तुम्हाला एकदम काय जाणवते ते लिहा?
- जर 'हो' उत्तर असेल तर काय?
- जर उत्तर 'नाही' असेल तर परत एकदा सर्व तत्त्ववेत्त्यांची मते वाचा.

खूप कोवळ्या वयात बालके शाळेत जायला लागतात. शालापूर्व अवस्था ही जीवनातील सर्वात महत्त्वाची अवस्था आहे. इथे महत्त्वाची या शब्दाचा अर्थ असा आहे की बालके लवकरच्या वयात शाळेत जातात जेव्हा त्यांची मेंदूपेशींची जोडणी सुरू असते. म्हणून या वयाला पायाभरणीचा काळ म्हणतात. वयाची पहिली आठ वर्षे महत्त्वाची असतात हे संशोधनाअंती सिद्ध झाले आहे. याच काळात ८० % मानसिक विकास होतो. या आठ वर्षांपैकी ३ वर्षाचा काळ पूर्वप्राथमिक शाळेत जातो. तिथेच त्यांना विविध अध्ययन अनुभव प्रथमच मिळत असतात. अध्ययन करताना बालके पंचेन्द्रीयांचा वापर करतात. त्यामुळे सर्व शाळांनी उद्दीपन देणारे वातावरण पुरवावे, तसेच सुसंघटीत, सुसुत्र आणि अर्थपूर्ण अनुभव पुरवावेत. याचमुळे बालकांच्या मेंदूपेशीची जोडणी दृढ होते.

**तुम्हाला माहित आहे का?**

मज्जासंस्थेचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे चेतापेशी. सामान्य भाषेत यालाच 'मेंदूपेशी' असे संबोधतात. मानवी मेंदूमध्ये ८६ अब्ज चेतापेशी असतात. शरीरातील इतर पेशींप्रमाणे चेतापेशीची कधीच विभागणी होत नाही, त्या मरतही नाहीत किंवा त्याजागी दुसऱ्या पेशीही तयार होत नाहीत. मानवी मेंदूतील फक्त मेंदूपेशी विभागणी करू शकतात. त्या प्रक्रियेला न्यूरोजेनेसीस म्हणतात. गर्भावस्थेतील काळात ही प्रक्रिया सुरू होते ती बाळाच्या जन्मानंतरही थोडे दिवस चालू राहते.

## पूर्वप्राथमिक शाळांचे विविध प्रकार (Various Types of Preprimary schools)

### • खेळगट (Play Group)



चित्र ११.२ खेळगट

मोठ्या सामाजिक जगतात पाऊल टाकण्यासाठी खेळगटात जाणे हा प्रवेश आहे. शाळेच्या वातावरणाशी जुळवून घेणे हा या शाळांचा प्राथमिक हेतू आहे. शाळेच्या वेळाही कमी कालावधीच्या असतात. बालकांची अवधान कक्षाही ३ मिनिटांपेक्षा जास्त नसते. यानुसार उद्दिष्टे ठरवली जातात.

खेळगटाची उद्दिष्टे (Objectives of Play Group)

- बालकांचे मनोरंजन करणे.
- बालकांना शाळेच्या वातावरणाची ओळख करून देणे.
- बालकांना वातावरणाबरोबर आंतरक्रिया करण्यास मदत करणे.
- सर्वांगीण विकासास चालना देणे.
- बालकांना त्यांची अवधान कक्षा वाढवण्यास मदत करणे.

### • बालमंदिर (Nursery school)



चित्र ११.३ बालमंदिर

१९११ साली मागरिट आणि राचेल मॅकमिलन भगिनींनी नर्सरीस्कुल ही संकल्पना अस्तित्वात आणली. कारखान्यातील कामगार स्त्रियांच्या बालकांसाठी प्रामुख्याने त्यांनी नर्सरी स्कुल सुरू केली. त्यांनी फ्रोबेल यांच्याकडून प्रेरणा घेतली आणि त्यांच्या शाळेमध्ये मानसिक विकासाच्या कृतींचा समावेश केला.

बालमंदिर याची उद्दिष्टे (Objectives of nursery school)

- आरोग्यपूर्ण वातावरण पुरवणे.
- आनंदी आणि आरोग्यपूर्ण वातावरण निर्मिती करणे.
- स्वत:साठी चांगल्या सवयी लावून घेण्यास बालकांना मदत करणे.
- कल्पनाशक्ती विकसित होण्यासाठी संधी देणे व कौशल्य विकसित होण्यास मदत करणे.
- सामाजिक जीवनातील अनुभवांचे छोट्या प्रमाणावर आयोजन करणे.
- घरगुती जीवनाप्रमाणे शाळेचे वातावरण पुरवून एकसंधपणा मिळवणे.

- ## किंडरगार्टन Kindergarten (K.G.)



चित्र ११.४ किंडरगार्टन

फ्रेडरिक फ्रोबेल यांनी किंडरगार्टनची संकल्पना विकसित केली. फ्रोबेल यांची शाळा पुढील तत्त्वांवर आधारित होती. : 'एकत्रित राहणे' या तत्त्वानुसार मानव आणि निसर्ग यांना एकत्र ठेवणे घडत असते. सर्व गोष्टी ईश्वराने 'एकत्रितच निर्माण' करून पाठवल्या आहेत.

किंडरगार्टन हा जर्मन भाषेतील शब्द आहे. याचा अर्थ 'बालकांची बाग' असा आहे. शाळा ही एक बाग आहे अशी कल्पना करून शिक्षक या बागेचा माळी आहे आणि बालके म्हणजे त्या बागेतली कोवळी रोपे आहेत अशी कल्पना सांगितली आहे.

किंडरगार्टन शाळेची उद्‌दिष्टे (Objectives of Kindergarten)

- बालकांना शरीर सुदृढ करण्यास संधी देणे.
- इंद्रियांना सराव देणे.
- निसर्गाची ओळख बालकांना करून देणे.
- सर्वांगीण विकास समृद्ध करणे.
- बालकांचा सामाजिक विकास घडवणे.
- बालकांचा सुप्त विकास घडण्यास चालना देणे.

- ## अंगणवाडी (Anganwadi)



चित्र ११.५ अंगणवाडी

कोसबाडच्या टेकडीवर ताराबाई मोडक यांच्या पुढाकाराने आदिवासी बालकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सुरू झाला. अगोदर त्यांनी कुरणशाळा सुरू केल्या. जी गुराखी बालके त्यांची चरायला सोडलेली गुरे सोडून शाळेत येऊ शकत नसत त्यांच्यासाठी कुरणात जाऊन शिक्षक शिकवत असत. हा मितौपचारिक शिक्षणाचा आदर्श प्रकार खूप वर्षांपूर्वी सुरू झाला होता. याचप्रमाणे ताराबाई मोडक यांनी अंगणवाडी शाळा सुरू केल्या. पुढे त्याला अनुताई वाघ यांनी आणखी आकार प्राप्त करून दिला.

आदिवासी पाड्यांच्या अंगणात झाडाखाली अंगणवाडी शाळा भरत असत. आदिवासी जीवनाशी निगडीत शिक्षण अंगणवाडीत दिले जात होते. सद्यस्थितीत अंगणवाडी ही संकल्पना 'एकात्मिक बालविकास सेवा' Integrated Child Development services (ICDS) या योजनेअंतर्गत १९७५-७६ सालापासून अस्तित्वात आहे. अंगणवाडी शाळा झोपडपट्टी, ग्रामीण भाग या ठिकाणी चालू आहेत. अंगणवाडी शिक्षकाला अंगणवाडी सेविका असे संबोधतात.

अंगणवाडीची उद्‌दिष्टे (Objectives of Anganwadi)

- सामाजिक-आर्थिकदृष्ट्या जी बालके वंचित आहेत त्यांच्यासाठी सेवा पुरवणे.
- कुपोषित बालकांसाठी पोषक आहार पुरवणे.
- दर्जेदार अन्नपुरवठा करणे.

- बालकांचा सर्वांगीण विकास साध्य करणे.
- बालकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरवणे.


### १.३ करमणूक केंद्रे (Centres for recreation)

वेगळ्या हेतू व उद्दिष्टांनी करमणूक केंद्रे चालवली जातात. मुलांचे मनोरंजन करणे हा प्रमुख हेतू असतो. अशा प्रकारची केंद्रे आजच्या काळात मोठ्या शहरांमधून किंवा थोड्याफार ग्रामीण भागातून मनोरंजन केंद्रे आढळतात.

करमणूक केंद्रांची उद्दिष्टे (Objectives of Recreation centers)

- विविध खेळकृतीमधून बालकांचे मनोरंजन करणे.
- खेळण्यासाठी मोठी आणि मोकळी जागा पुरवणे.
- संरक्षित आणि सुरक्षित वातावरण पुरवणे.
- सुसंघटीत कृती पुरवणे.
- बालकांच्या मोकळ्या वेळाला योग्य दिशेला वळवणे.

### १.४ बालकांसाठी इतर केंद्रे




वर उल्लेख केलेली सर्व केंद्रे सगळीकडे उपलब्ध नसतात परंतु मोठ्या शहरात किंवा काही वेळा ग्रामीण भागातही उपलब्ध असतात. बालकांसाठी काम करायची इच्छा असलेल्यांनी अशी केंद्रे सुरू करावीत.

## शब्दसूची *Glossary*

**नवीन ज्ञानाला जागा करणे (Accommodation) :** अगोदरचे ज्ञान व नव्याने मिळवलेले ज्ञान यावर प्रक्रिया करून नवीन ज्ञानाला जागा करणे.

**ज्ञान गोळा करणे (Assimilation) :** मिळणारी माहिती समजून घेऊन मेंदूमध्ये साठवण्याची प्रक्रिया.

**बालशिक्षणाची केंद्रे (Child education centers) :** औपचारिक शिक्षणासाठी सिद्ध करणारी केंद्रे.

**बालसंगोपन केंद्र (Day care centre) :** जी बालके संपूर्णपणे स्वावलंबी नसतात अशा बालकांसाठी संगोपन व करमणूक सुविधा उपलब्ध करून देणारे केंद्र.

**प्रयोगवाद (Experimentalism) :** प्रयोगवाद म्हणजे निरनिराळ्या विषयातील संशोधनासाठी अभ्यास करणे आणि नवीन अनुभवासाठी प्रेम असणे.

**शोधवृत्ती (Exploration) :** एखादी गोष्ट शोध घेण्यासाठी केलेली कृती.

**अगदी नव्याने शिकून लक्षात ठेवलेल्या गोष्टी (Law of recency) :** अवघड गोष्टीसुद्धा या न्यायाने लक्षात ठेवण्याची विद्यार्थ्यांची खुबी.

**व्यावहारिकता (Pragmatic view) :** योग्य पद्धतीने, व्यवहाराला धरून व चालू काळाला अनुसरून समस्या सोडवण्याचे.

**प्रगतीवाद (Progressivism) :** प्रगतीवाद म्हणजे सामाजिक रचनेत केले जाणारे बदल.

**करमणूक केंद्र (Recreation center) :** मोकळा वेळ करमणूकीच्या कृतींद्वारे योग्य दिशेने व्यतीत करण्याची जागा.

**विज्ञान केंद्र (Science centre) :** बालकांच्या विज्ञान दृष्टीकोन विकासासाठी वयानुरूप योग्य विविध विज्ञान प्रयोग, वातावरणाशी आंतरक्रिया शोध घेण्याच्या वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी असलेली जागा रूपात बालकांसमोर आणण्याचे ठिकाण

**उद्दीपन केंद्र (Stimulation center) :** सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी ज्या कृतींचे आयोजन केले जाते अशा केंद्रांना उद्दीपन केंद्रे म्हणतात.

**कथा केंद्र (Story club) :** बालकांच्या भाषाविकासासाठी वयानुरूप कथा विविध रुपात बालकांसमोर आणण्याचे ठिकाण.

**प्र. १ दिलेल्या पर्यायातून सर्वात योग्य शब्द निवडा व वाक्य लिहा.**

(१) ११ ते १६ व्या शतकात बालकांना मानवाची ................. मानत होते.

(अ) प्रौढ (ब) प्रतिकृती

(क) सावली

(२) मध्ययुगीन काळातील घरांमधून बालकांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर ................. गोष्टीची कमतरता होती.

(अ) प्रेम (ब) भीती

(क) मत्सर

(३) एमिल हे पुस्तक ................. यांनी लिहिले.

(अ) फ्रोबेल (ब) रुसो

(क) पियाजे

(४) फ्रेडरिक फ्रोबेल यांनी सुरू केलेल्या शाळेला ................. म्हणतात.

(अ) नर्सरी स्कूल (ब) खेळगट

(क) किंडरगार्टन

(५) जॉन ड्युई यांनी प्रयोगासाठी शाळा ................. येथे उभारली.

(अ) शिकागो (ब) फ्रान्स

(क) भारत

(६) ताराबाई मोडक यांनी ................. सुरू केल्या.

(अ) अंगणवाडी (ब) बालवाडी

(क) विकासवाडी

(७) सर्वात पहिले बालसंगोपन केंद्र १८४० साली ................. येथे स्थापन झाले.

(अ) अमेरिका (ब) स्वीडन

(क) फ्रान्स

**प्र. २ (अ) जोड्या लावा.**

| तत्त्ववेत्ते | शिक्षणविचार |
|---|---|
| (१) फ्रेडरिक फ्रोबेल | (अ) निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे. |
| (२) मारिया माँटेसरी | (ब) बालक विकासाच्या विविध अवस्थांमधून जात असते. |
| (३) रुसो | (क) बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षीस (गिफ्ट) |
| (४) पेस्टॉलॉझी | (ड) खेळाद्वारे शिक्षण पद्धतीचा बालशिक्षणात वापर |
| (५) पियाजे | (इ) मानसिक दुर्बल बालकांसाठी काम केले. |

**(ब) जोड्या लावा.**

| तत्ववेत्ते | शिक्षणविचार |
|---|---|
| (१) गुरु रवींद्रनाथ टागोर | (अ) शारीरिक विकास महत्त्वाचा आहे |
| (२) पद्मश्री अनुताई वाघ | (ब) नयी तालीम-स्वयंअध्ययन |
| (३) स्वामी दयानंद सरस्वती | (क) ग्राममंगलची स्थापना |
| (४) श्री आरोबिंदो घोष | (ड) निसर्गाच्या सान्निध्यात खरे शिक्षण होते |
| (५) महात्मा गांधी | (इ) शिक्षणाचा एकात्मिक विचार |

**प्र. ३ टिपा लिहा.**

(१) बालसंगोपन आणि बालशिक्षणाचा इतिहास

(२) विविध बालकेंद्रांची गरज

(३) जॉन कोमिनस

(४) पूर्वप्राथमिक शाळा

(५) करमणूक केंद्र

**प्र. ४ संज्ञा स्पष्ट करा.**

(१) अंगणवाडी

(२) किंडरगार्टन

(३) क्रेश

**प्र. ५ तालिका पूर्ण करा.**

| अनु. क्र. | शिक्षणतज्ञांचे नाव | शाळांचे प्रकार |
|---|---|---|
| १. | ............................... | प्रयोगासाठी शाळा |
| २. | गिजुभाई बधेका | ............................... |
| ३. | फ्रेडरिक फ्रोबेल | ............................... |
| ४. | ............................... | अंगणवाडी |
| ५. | ताराबाई मोडक | ............................... |

**प्र. ६ रिकामे चौकोन पूर्ण करा.**

(१) शाळेचा प्रकार

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  | री |  | ल |

(२) आधुनिक शिक्षणाचे पितामह

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
|  | न |  |  | मि |  | स |

(३) कोसबाडच्या टेकडीवरून या पुस्तकाच्या लेखिका पद्मश्री .....................

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ |  |  | ई |  | घ |

**प्र. ७ बरोबर उत्तरासाठी अक्षरांची उलटापालट करा.**

(१) संदर्भ : रुसो यांचे प्रसिद्ध पुस्तक

शब्द : मिएल                    उत्तर : ?

(२) संदर्भ : बालकांना विज्ञान शिकवू नये ते मिळवावे.

शब्द : धाशोतून उत्तर : ?

(३) संदर्भ : ताराबाई मोडक यांनी शाळा सुरू केली.

शब्द : डीविकावास उत्तर : ?

### प्र. ८ खालील विचारांवर कोणी विश्वास दाखवला.

(१) पूर्व बाल्यावस्थेच्या काळात स्वतःची सर्जनशीलता असते.

(२) ईश्वर सर्व गोष्टी चांगल्याच करतो.

(३) बालकाच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी दर्जेदार बालशिक्षण गरजेचे आहे.

(४) बालकाच्या इंद्रिय शिक्षणावर मातांनी विशेष लक्ष द्यावे.

(५) इंद्रिय संवेदन महत्त्वाचे आहे./ निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे.

### प्र. ९ उद्दिष्टे लिहा.

(१) बालमंदिर (नर्सरी स्कूल)

(२) अंगणवाडी

(३) मनोरंजन केंद्र

(४) बालसंगोपन केंद्र

(५) खेळगट

### प्र.१० खालील विचार कोणी लिहिले आहेत.

(१) बालशिक्षणामध्ये खेळाद्वारे शिक्षण ही पद्धती महत्त्वाची आहे.

(२) बालकांना सुचणाऱ्या नवीन कल्पना टिकवण्यासाठी शिक्षकांनी मदत करावी.

(३) बालकांसाठी खेळण्याच्या वस्तूंचा शोध लावला त्याला बक्षीस (गिफ्ट) असे म्हटले.

(४) पंचेंद्रियांचे संवेदन महत्त्वाचे आहे.

(५) बालकाच्या उत्स्फुर्त विकासासाठी खेळ गरजेचा आहे.

(६) विकासामध्ये व्यावहारिक विचार महत्त्वाचे आहेत.

(७) 'गुरु' म्हणजेच शिक्षक हा बालकांचा दुसरा पालकच असतो.

(८) मानवी व्यक्तिमत्त्वातील भौतिक आणि अध्यात्मिक बाजूंचे एकात्मीकरण झाले पाहिजे.

(९) मन एकाग्र करणे व ध्यानधारणा यातून मानसिक विकास होतो.

(१०) मॉंटेसरी पद्धतीमध्ये खूप रस घेऊन अभ्यास केला.

### प्रकल्प / स्वयंअध्ययन

- पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा तक्ता तयार करा.
- पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा तक्ता तयार करा.